# कळवा वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/८७ /२०२५ दि.०२/०५/२०२५

**–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–**

**ज्याअर्थी, कळवा** वाहतूक उपविभागाचे हद्दीत महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या नियंत्रणाखाली रचना कन्ट्रक्शन कंपनी यांचे कडुन वडपे ते ठाणे राष्ट्रीय महामार्ग क्र.३ वरील नवीन कशेळी खाडी पुलाचे काम करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने दिनांक ०३/०५/२०२५ रोजी सकाळी ०२:०० वा ते ०४:०० वा. पावेतो कशेळी पुलावरील गर्डरचे Alignment Correction चे काम मुंबई नाशिक वाहिनीवरील खाडी ब्रिजवर करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/ इ१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) मुंबई नाशिक वाहिनीवरील सर्व प्रकारच्या वाहनांना खारीगाव खाडी ब्रिजच्या सुरवातीस **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** मुबई नाशिक वाहिनीवरील सर्व प्रकारची वाहने खाडीब्रिजच्या सुरवातीला उजव्याबाजूस वळण घेवून नाशिक मुबई वाहिनीवरून एकेरी वाहतूक करून खाडीब्रिज संपल्यानंतर बॉम्बे ढाबा समोरील कट मधून डावे वळण घेवून पुन्हा मुबई नाशिक वाहिनीवरून इच्छित स्थळी जातील. **त्यादरम्यान नाशिक मुबई वाहिनीवरील सर्व प्रकारची वाहने थांबून राहतील. सदरची वाहने विशिष्ट वेळे करीता टप्या टप्याने वाहतूक नियोजना नुसार सोडण्यात येतील.**

सदर वाहतूक अधिसूचना दि. ०३/०५/२०२५ रोजी रात्रौ ०२:०० ते रात्रौ ०४:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने, व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ५, वि.शा. ठाणे

CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी** :—
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

**प्रत** :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :— संबंधित सपोआ वाहतूक विभाग, पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

CamScanner